दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार, 26 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 109 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# नाशिकला समृद्धी महामार्गाची थेट कनेक्टिव्हिटी, पांढुर्ली कनेक्टरला तत्त्वतः मंजुरी

नाशिकला समृद्धी महामार्गाची थेट कनेक्टिव्हिटी, पांढुर्ली कनेक्टरला तत्त्वतः मंजुरी

■ नाशिक वृत्तसंस्था


**नाशिक शहराला नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाशी थेट जोडण्यासाठी पांढुर्ली येथे नव्या कनेक्टरची उभारणी करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः मंजुरी दिली आहे. नाशिकपासून सुमारे २८ किलोमीटर अंतरावर हा कनेक्टर प्रस्तावित असून, सुमारे ३०० ते ३५० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असल्याची माहिती आहे. या कनेक्टरमुळे नाशिककरांचा समृद्धी महामार्गापर्यंतचा प्रवास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.**

### प्रकल्प वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन

■ नाशिकला समृद्धी महामार्गाशी थेट जोडणारा हा प्रकल्प पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी पूर्ण करण्याची तयारी सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे. त्यामुळे हे काम अत्यंत वेगाने केले जाणार असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. पांढुर्ली कनेक्टर नाशिकपासून अंदाजे २८ किलोमीटर अंतरावर असेल. सुमारे ३०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून, अल्प भूसंपादनात तो पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सुरुवातीला सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी समृद्धी महामार्गावर प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठीचा मार्ग सुरू करण्याच्या दृष्टीने दोनपदरी रस्ता तयार केला जाईल. त्यानंतर योग्य वेळी जमीन संपादित करून रस्त्याची रुंदी चारपदरी करण्याचे नियोजन आहे. दुसऱ्या प्रकल्पाच्या माध्यमातून नाशिक शहर ते पांढुर्ली दरम्यानचा रस्ताही विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना समृद्धी महामार्गावर ये-जा करणे अधिक सोयीस्कर आणि सुकर होणार आहे.

### समृद्धी महामार्ग नाशिकच्या जवळ येणार ?

■ सध्या नाशिककरांना समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी इगतपुरी, भरवीर खुर्द आणि सिन्नर हे प्रमुख पर्याय उपलब्ध आहेत. इगतपुरी कनेक्टर नाशिकपासून सुमारे ४५ किलोमीटर, तर भरवीर खुर्द कनेक्टर सुमारे ४४ किलोमीटर अंतरावर आहे. सिन्नरमार्गेही समृद्धी महामार्ग गाठण्यासाठी सुमारे ४० किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. इगतपुरीमार्गे मुंबईकडे जाताना वाहनधारकांना घोटी टोल प्लाझासह समृद्धी महामार्गाचा स्वतंत्र टोल द्यावा लागतो. तर भरवीर खुर्दच्या मार्गावर ग्रामीण भागातील तुलनेने अरुंद रस्त्यामुळे प्रवासाचा वेळ वाढतो. नव्या पांढुर्ली कनेक्टरमुळे नाशिक शहरातून समृद्धी महामार्गावर पोहोचण्याचे अंतर जवळपास निम्म्याने कमी होण्याची अपेक्षा आहे.



### दुहेरी भुर्दंडातूनही सुटका होणार ?

■ नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन या कनेक्टरसाठी सातत्याने पाठपुरावा करत होते. पांढुर्ली कनेक्टरमुळे मुंबई तसेच नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना समृद्धी महामार्गावर अधिक जलद प्रवेश मिळणार असून, प्रवासाचा वेळ आणि अंतर कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळातही नाशिकच्या वाहतूक व्यवस्थेला या प्रकल्पाचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. सोबतच टोलच्या दुहेरी भुर्दंडातूनही वाहनधारकांची सुटका होण्याची अपेक्षा आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गावपातळीवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्याच्या सूचना

### परळी ग्रामीण पोलिसांचे मार्गदर्शन; सीसीटीव्ही, बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची नोंद ठेवण्याचे आवाहन

■ परळी : नितीन ढाकणे

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गावपातळीवर सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासंदर्भात आयोजित बैठकीत पोलीस प्रशासनाकडून संबंधितांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

प्रत्येक गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते कार्यरत आहेत की नाही, याची नियमित तपासणी करावी, तसेच गावात बाहेरून येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची आवश्यक माहिती व ओळखपत्राची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवावी, अशा सूचना देण्यात आल्या. गावात कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा अनुचित घटना निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित पोलीस ठाण्याला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

तसेच पोलीस ठाण्याकडून चौकशी किंवा आवश्यक माहितीसाठी संपर्क साधल्यास तत्काळ प्रतिसाद देऊन पोलिसांना सहकार्य करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. गणेशोत्सव काळात नागरिकांनी सतर्क राहून अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासन आणि पोलिसांना




सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मल्हारी शिवरकर, पोलीस कर्मचारी, महिला पोलीस कर्मचारी तसेच पोलीस पाटील उपस्थित होते.

## खेलो इंडिया संवादातून १,६०० ठिकाणांवरील ८ लाखांहून अधिक युवकांशी संवाद

■ मुंबई : वृत्तसंस्था

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २७ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आभासी माध्यमातून ' युवा कनेक्ट ' कार्यक्रमांतर्गत देशभरातील १,६०० ठिकाणांवरील ८ लाखांहून अधिक युवकांना संबोधित करणार आहेत. युवा सहभाग, क्रीडा विकास आणि राष्ट्रनिर्माणावर भर देणाऱ्या या उपक्रमामुळे विविध भागांतील युवक एका समान राष्ट्रीय व्यासपीठावर जोडले जाणार आहेत, अशी माहिती मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत असलेल्या माय भारत - महाराष्ट्र विभागाचे राज्य संचालक अमित पुंडे यांनी दिली.

यावेळी महाराष्ट्रचे राज्य संचालक अमित पुंडे, माय भारत, मुंबईचे उपसंचालक अनूप इंगोले, भारतीय क्रीडा प्राधिकरण (स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया - SAI) चे उपसंचालक माधव कांबळे उपस्थित होते.

अमित पुंडे म्हणाले, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच मुंबई येथे आयआयटी, पवई येथे केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी



यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. पुणे येथे केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे भुसावळ (जि. जळगाव) उपस्थित असतील.

माय भारत, भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने देशभरात खेलो इंडिया संवाद आयोजित करण्यात येत आहे. भारतातील युवक, खेळाडू आणि क्रीडा व्यावसायिकांना एकत्र आणणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. देशातील प्रत्येक जिल्ह्यातील दोन महाविद्यालयांमध्ये युवा कनेक्ट आयोजित करण्यात येणार आहे. आयआयटी पवई, सिम्बॉयसिस आणि एम्स नागपूर यांसारख्या संस्थांमध्येही हा उपक्रम राबविण्यात येईल.

कार्यक्रमात युवकांना खेळाडू, खासदार, आमदार, मंत्री आणि स्थानिक नेत्यांशी थेट संवाद साधता येणार आहे. तसेच भारतीय क्रीडा क्षेत्राच्या भविष्यासाठी आपले विचार आणि आकांक्षा मांडण्याची संधी मिळणार आहे. गेल्या १२ वर्षांतील भारताच्या क्रीडा परिसंस्थेतील परिवर्तनाचा प्रवास अधोरेखित करणे आणि युवकांच्या आकांक्षा जाणून घेणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

सहभागी युवकांना संकेत सरगर, स्वप्नील कुसाळे, रुझा भोसले, प्रीतम साळवे, फाल्गुनी पिल्लई आणि पूर्वा जाधव यांच्यासह नामांकित खेळाडूंशी संवाद साधता येणार आहे. या चर्चेत खेळाडूंचा क्रीडा प्रवास तसेच भारतीय क्रीडा पायाभूत सुविधा आणि क्रीडा परिसंस्थेत झालेल्या परिवर्तनावर चर्चा केली जाईल, असेही यावेळी पुंडे यांनी सांगितले.

युवा संवादात क्रीडा परिसंस्था मजबूत करणे, २०३६ ऑलिम्पिकसाठी वैज्ञानिक पद्धतीने प्रतिभा ओळखून खेळाडू विकसित करणे, युवा नेतृत्वाला शासन प्रक्रियेत अर्थपूर्ण सहभागासाठी प्रोत्साहन देणे आणि विकसित भारतासाठी युवकांना आवश्यक कौशल्ये, स्वयंसेवा व राष्ट्रनिर्माणाच्या संधींशी जोडणे या चार प्रमुख विषयांवर विचारमंथन होणार आहे.

## आष्टी तालुक्यावर आसमानीचे संकट; पावसाळ्यातच दुष्काळाची जाणीव

### चाऱ्याच्या टंचाईमुळे दूध उत्पादक शेतकरी हवालदिल, चारा छावण्या सुरू करण्याची मागणी

■ संतोष सानप | आष्टी

मृग नक्षत्रापासून पावसाळा सुरू होऊन आज जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटला तरी आष्टी तालुक्यामध्ये समाधानकारक असा जोरदार पाऊस झालेला नाही. जूनच्या सुरुवातीपासून ते ऑगस्टअखेरपर्यंत पावसाने सातत्याने ओढ दिल्याने तालुक्यातील सर्व मध्यम व लघू सिंचन प्रकल्प पूर्णपणे कोरडेठाक पडले आहेत. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे विहिरी आणि कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत मोठी घट झाली असून संपूर्ण तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप पिके हातातून जाण्याच्या मार्गावर असतानाच आता जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनल्याने बळीराजा संकटात सापडला आहे.

आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर दुग्ध व्यवसाय चालत असून ग्रामीण भागातील हजारो कुटुंबे यावर अवलंबून आहेत. तालुक्यात पशुधनाची संख्या लक्षणीय असल्याने सध्या हिरव्या व सुक्या चाऱ्याची तीव्र टंचाई भासू लागली आहे. सध्या बाजारात दुधाला समाधानकारक दर मिळत असला तरी दुष्काळी संकटामुळे चाऱ्याचे आणि पशुखाद्याचे भाव गगनाला भिडले आहेत. वाढत्या महागाईमुळे जनावरांचा दैनंदिन सांभाळ करणे दूध उत्पादकांसाठी आर्थिकदृष्ट्या अशक्य होत चालले आहे. विकतचा चारा आणून दुग्ध व्यवसाय करणे परवडत नसल्यामुळे अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत.

पावसाची कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने दिवसेंदिवस परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. पाऊस लांबल्यास पशुधन वाचवणे कठीण होणार असून शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्य शासनाने व स्थानिक प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल



घेऊन आष्टी तालुक्यात तातडीने शासकीय चारा डेपो किंवा चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी आर्त हाक तालुक्यातील हवालदिल झालेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून दिली जात आहे.

"आष्टी तालुक्यात यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीपासूनच पावसाचे प्रमाण अत्यल्प आणि असमान राहिले आहे. तालुक्यातील सर्वच मंडळांमध्ये अधूनमधून पावसाच्या सरी झाल्या असल्या, तरी त्यात सातत्य व जोर नसल्याने जूनपासून २५ ऑगस्टपर्यंत अपेक्षित पर्जन्यमानाच्या तुलनेत मोठी तूट निर्माण झाली आहे. ऑगस्ट महिन्यातही पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिकांवर संकटाचे सावट असून, अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाईही जाणवत आहे. त्यामुळे आता दमदार आणि सर्वदूर पावसाची आष्टी तालुक्यातील शेतकरी व नागरिक आतुरतेने प्रतीक्षा करीत आहेत."

# हजारो विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, छत्री व वह्यांचे वाटप ; स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

## विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणारा उपक्रम : आमदार महेश बालदी ; 'एकही आदिवासी बांधव कुड्याच्या घरात राहणार नाही' : आमदार महेश बालदी

**पनवेल/ वृत्तसंस्था**

शिक्षण हेच खरे सामर्थ्य' या विचाराला केंद्रस्थानी ठेवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्यासाठी अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य शैक्षणिक साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने आज मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला. कर्जत फाटा येथील एन. डी. स्टुडिओ येथे आयोजित या कार्यक्रमात हजारो विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, छत्री आणि वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमास उरण-खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाला माजी आमदार देवेंद्र साटम, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आयोजक अशोक छाजेड, सौ.संगीता अशोक छाजेड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल मेहुल, प्रांत अधिकारी प्रकाश सकपाळ, तहसीलदार अभय चव्हाण, एन डी स्टूडियो चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत साजणीकर, मुख्य लेखाधिकारी चित्रलेखा खातू, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, जिल्हा परिषद सदस्या नेहा पारंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, सरपंच रीतू ठोंबरे, सुधीर ठोंबरे, भाजपचे मंडल अध्यक्ष प्रवीण मोरे, अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्ट चे उपाध्यक्ष संतोष खांडेकर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, शैक्षणिक साहित्याअभावी विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये आणि प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहात आत्मविश्वासाने पुढे जाता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना शाळेसाठी आवश्यक असलेले साहित्य एकाच वेळी उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह या उपक्रमाचे यश अधोरेखित करणारा ठरला. सामाजिक बांधिलकी जपत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात देणारा हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



**सामाजिक बांधिलकीचा आदर्श**

**अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची भावना अधोरेखित झाली आहे. शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत साहित्याची मदत देऊन गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर करणे आणि त्यांना आत्मविश्वासाने शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिल्यास शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकते. या भावनेतून अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टने सातत्याने सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा कायम ठेवली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र पर्वावर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणारा हा उपक्रम केवळ शैक्षणिक साहित्य वाटपापुरता मर्यादित न राहता, 'शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी' यांचा संदेश देणारा ठरला. हजारो विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेले आनंदाचे हास्य आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मिळालेली प्रेरणा हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरली.**

### विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणारा उपक्रम : आमदार महेश बालदी

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आमदार महेश बालदी यांनी अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणारा हा उपक्रम आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार. ८० व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आजचा दिवस विद्यार्थी आणि आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एन. डी. स्टुडिओ पाहण्याची संधी मिळणे ही विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणीच आहे. एन. डी. स्टुडिओच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख करताना आमदार बालदी म्हणाले, "आमचे परममित्र नितीन चंद्रकांत देसाई यांच्या निधनानंतर हा स्टुडिओ ओसाड झाला होता. मात्र, नितीन देसाई यांच्यावर असलेले प्रेम आणि कलाकार म्हणून त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नामदार आशिष शेलार यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आणि या स्टुडिओला नवसंजीवनी दिली. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.अशोक छाजेड यांच्या कुटुंबाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख करताना आमदार बालदी म्हणाले, "अशोक छाजेड यांच्या वडिलांपासून आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सामाजिक उपक्रम करणे हे छाजेड कुटुंबाचे एक ध्येय राहिले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हा उपक्रम राबविण्यात आला आहे. समाजाबद्दलची आस्था या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये मायक्रो प्लॅनिंग महत्त्वपूर्ण ठरले आहे." अशा शब्दांत त्यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

### 'वंदे मातरम्'चे गायन अभिमानाची बाब

स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व अधोरेखित करताना आमदार महेश बालदी म्हणाले, "आज स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशाचा मानबिंदू असलेल्या लाल किल्ल्यावर पहिल्यांदाच 'वंदे मातरम्' गायले गेले आहे. ही सर्व भारतीयांसाठी अभिमानाची आणि ऊर भरून येणारी बाब आहे." देश विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असल्याचे सांगून त्यांनी या भागातील विविध विकासकामांचाही उल्लेख केला. "देश विकासात बदलत आहे. त्या अनुषंगाने अनेक प्रकल्प या भागात येत आहेत. जेएनपीटी चौक महामार्गाशी जोडला जाणार आहे. त्यामुळे येत्या काळात हा परिसर मुंबईला थेट जोडला जाणार असून, याचा मोठा फायदा विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांना होणार आहे," असे त्यांनी सांगितले.

### 'एकही आदिवासी बांधव कुड्याच्या घरात राहणार नाही'

उरण मतदारसंघातील आदिवासी बांधवांच्या घरांच्या प्रश्नावरही आमदार महेश बालदी यांनी ठाम भूमिका व्यक्त केली. "माझ्या उरण मतदारसंघातील एकही आदिवासी बांधव कुड्याच्या घरात राहणार नाही, तो पक्क्या घरात राहील, यासाठी माझे कायम प्रयत्न आहेत. आणि हे मी पूर्ण करून दाखवीन," अशी ठाम ग्वाही त्यांनी आपल्या भाषणातून दिली.

# पनवेलचे अनिरुद्ध (मंदार) भिडे यांना आकाशवाणी मुंबईकडून सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' गायकाचा मान

## गायन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल ; गुरुजनांसह आई-वडील, पत्नी, कुटुंबीय व शुभचिंतकांप्रती व्यक्त केली कृतज्ञता

**पनवेल/ वृत्तसंस्था**

गायन क्षेत्रात सातत्यपूर्ण साधना, मेहनत आणि आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गायनशैलीच्या बळावर उल्लेखनीय वाटचाल करणारे पनवेलमधील गायक अनिरुद्ध (मंदार) भिडे यांना ऑल इंडिया रेडिओ, आकाशवाणी मुंबईकडून सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' गायकाचा दर्जा प्राप्त झाला आहे. आकाशवाणीच्या माध्यमातून संगीत क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या मंदार भिडे यांच्या कलात्मक गुणवत्तेला आणि गायनातील सातत्यपूर्ण योगदानाला मिळालेली ही महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे.

आकाशवाणीच्या 'ए ग्रेड' मानांकनाला संगीत क्षेत्रात विशेष महत्त्व असून, या मानांकनामुळे अनिरुद्ध (मंदार) भिडे यांच्या संगीतप्रवासात आणखी एक मानाचा टप्पा गाठला गेला आहे. या सन्मानामुळे आपल्याला अत्यंत आनंद आणि समाधान मिळाले असून, यापुढील संगीतप्रवासासाठी नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना मंदार भिडे यांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

आपल्या या यशामागे आदरणीय गुरु पं. यशवंत देव आणि पं. नारायण बोडस यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभल्याचे अनिरुद्ध (मंदार) भिडे यांनी सांगितले. संगीताचे बारकावे, गायनातील शिस्त, स्वरांची जाण आणि संगीताकडे पाहण्याची समृद्ध दृष्टी गुरुजनांकडून मिळाल्याचे नमूद करत त्यांनी आपल्या गुरुजनांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. संगीत क्षेत्रातील वाटचालीत गुरुंचे मार्गदर्शन ही आपली मोठी शिदोरी असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.तसेच वडील विश्वास भिडे आणि आई वृषाली भिडे यांनी दिलेले



संस्कार, आशीर्वाद, प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण पाठिंबा हा आपल्या संगीतप्रवासाचा भक्कम आधार असल्याचे मंदार भिडे यांनी नमूद केले. बालपणापासूनच संगीताची आवड जोपासताना आणि गायक म्हणून स्वतःला घडविताना आई-वडिलांनी दिलेली साथ अत्यंत मोलाची ठरली. त्यामुळे आकाशवाणीचा 'ए ग्रेड' दर्जा मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या यशाचे श्रेय गुरुजनांसह आई-वडिलांना दिले. मंदार भिडे यांच्या संगीतप्रवासात पत्नी अश्विनी हिचीही महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. जीवनप्रवासातील साथीदार म्हणून तिने सातत्याने दिलेली प्रेरणा, समजूतदारपणा, प्रोत्साहन आणि पाठिंबा यामुळे आपला प्रवास अधिक बळकट झाला असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. याशिवाय कुटुंबीय, मित्र-मैत्रिणी, सहकारी कलाकार आणि विविध क्षेत्रातील हितचिंतक यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन व शुभेच्छा यांचाही त्यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. "'ए ग्रेड' हा दर्जा माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर संगीत अधिक मनापासून शिकत राहण्याची, सातत्याने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची आणि संगीताची सेवा अधिक निष्ठेने करत राहण्याची प्रेरणा आहे. हा सन्मान माझ्यासाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असला, तरी त्याचबरोबर अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे." अशी भावना मंदार भिडे यांनी व्यक्त केली.

संगीत हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून ते भावनांना स्पर्श करणारे आणि माणसाला समृद्ध करणारे माध्यम असल्याचे सांगत, भविष्यातही दर्जेदार सुगम संगीत सादर करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. आकाशवाणीच्या या मानांकनामुळे आपल्यातील संगीतसाधनेची जबाबदारी अधिक वाढली असून, रसिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहू, असेही त्यांनी सांगितले."या यशामुळे मी अत्यंत धन्य, विनम्र आणि प्रेरित झालो आहे. माझ्या संगीतप्रवासात ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे योगदान दिले, मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले आणि माझ्यावर विश्वास ठेवला, त्या प्रत्येक व्यक्तीप्रती मी मनःपूर्वक ऋणी आहे," अशा शब्दांत अनिरुद्ध (मंदार) भिडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आकाशवाणी मुंबईकडून सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' गायकाचा मान मिळाल्याबद्दल संगीत क्षेत्रातील मान्यवर, रसिक, कलाकार, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांकडून मंदार भिडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांच्या संगीतप्रवासाला नवी दिशा आणि उंची मिळाली असून, आगामी काळात त्यांच्या हातून अधिकाधिक दर्जेदार संगीतसेवा घडावी, यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.



## कामोठेतील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात ; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने परिसर भारावून गेला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध उपक्रमांद्वारे स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. यावेळी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य, राष्ट्रभक्ती आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे महत्त्व सांगण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त खारघरमध्ये रक्तदान शिबिर ; १०४ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## आमदार विक्रांतदादा पाटील यांच्याकडून किरण व नेत्रा पाटील दाम्पत्याच्या सामाजिक कार्याचे कौतुक

**पनवेल/ वृत्तसंस्था**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून युवाप्रेरणा सामाजिक संस्था, माहेश्वरी प्रगती मंडळ (खारघर) आणि सब-ऑर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन (SEA, वाशी) यांच्या संयुक्त विद्यमाने टाटा कॅन्सर हॉस्पिटल, खारघर येथील रुग्णांसाठी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विश्वज्योत हायस्कूल, सेक्टर २०, खारघर येथे पार पडलेल्या या शिबिरास नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला असून, एकूण १०४ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

कॅन्सरग्रस्त रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या हेतूने मागील १६ वर्षांपासून वर्षातून दोन ते तीन वेळा अशा शिबिरांचे सातत्याने आयोजन केले जात असल्याचे युवाप्रेरणा सामाजिक संस्थेच्या सचिव व माजी नगरसेविका सौ. नेत्रा किरण पाटील यांनी सांगितले. या शिबिराला विधान परिषदेचे आमदार विक्रांतदादा पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवले. याप्रसंगी बोलताना त्यांनी युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील आणि नेत्रा पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. जनसेवेचा भाव हृदयात ठेवून हे दाम्पत्य वर्षभर कला, क्रीडा, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात अविरत कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या शिबिरात डॉक्टर, वकील, अभियंते, उद्योजक, शिक्षक यांसारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनी आणि मोठ्या संख्येने तरुणाईने सहभाग घेतला. अनेक तरुणांनी प्रथमच रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात योगदान दिले. १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तरुणांनी चांगल्या सवयी म्हणून रक्तदानाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष किरण पाटील यांनी केले. कार्यक्रमास ठाणे माहेश्वरी सभेचे अध्यक्ष व डॉ. डी. वाय. पाटील फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राकेश सोमाणी यांची विशेष उपस्थिती लाभली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी माहेश्वरी प्रगती मंडळाचे राम दाद, सोमन मालानी, रोशन राठी, SEA वाशीचे जॉईंट सेक्रेटरी कुलदीप सिंग राजपूत यांच्यासह युवाप्रेरणा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. "रक्तदान हेच जीवनदान" या भावनेतून आयोजित या उपक्रमाने खारघरमधील सामाजिक एकजुटीचे दर्शन घडवले.




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी २० ऑगस्टपर्यंत प्रवेशाची संधी

**पनवेल/ वृत्तसंस्था**

नवी मुंबई महानगरपालिकेचे ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि मुंबई विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' या एक वर्षाच्या पदव्युत्तर पदविका (PG Diploma) अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी २० ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत असून इच्छुक पदवीधरांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) हा अभ्यासक्रम दोन सत्रांत (Semesters) विभागलेला असून, नोकरदार व इतर विद्यार्थ्यांना सोयीचे व्हावे यासाठी केवळ शनिवार आणि रविवारीच याचे वर्ग घेतले जातात. हा अभ्यासक्रम मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांत उपलब्ध आहे. प्रवेशासाठी वयाची कोणतीही अट नसून कोणत्याही मान्यतेप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेतील पदवीधरांकडून



अर्ज स्वीकारले जातील. हा अभ्यासक्रम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, सेक्टर-१५, ऐरोली, नवी मुंबई तसेच जे. पी. नाईक भवन, पहिला मजला, कलिना, सांता क्रूझ (पूर्व), मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचे संचालक प्रा. वाल्मीक के. सरवदे यांच्या नियंत्रणाखाली सुरू आहे. या अभ्यासक्रमाचे मूल्यांकन आणि प्रमाणपत्र मुंबई विद्यापीठाकडून दिले जाणार आहे. या अभ्यासक्रमाविषयी अधिक माहितीसाठी मुंबई विद्यापीठ कार्यालयातील ९३७२७३४२४७, ७३५०४०८६८६ या संपर्क क्रमांकावर किंवा नवी मुंबई महानगरपालिकेचे समाजसेवक श्री. दशरथ गंभीरे यांच्याशी ९७०२३०९०५४ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

## मुंबई रेल्वे पोलीस दलातील सुदाम भोजणे यांना केंद्र सरकारचा 'उत्कृष्ट सेवा पदक' सन्मान

**पनवेल/ वृत्तसंस्था**



मुंबई रेल्वे पोलीस दलात कार्यरत असलेले आणि जारकरवाडी गावचे सुपुत्र सुदाम भोजणे साहेब यांना पोलीस दलातील उल्लेखनीय व उल्लेखनीय सेवेबद्दल भारत सरकार, गृहविभाग यांच्याकडून अत्यंत मानाचा 'उत्कृष्ट सेवा पदक' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सुदाम भोजणे यांनी आपल्या कार्यकाळात दाखवलेली निष्ठा, कर्तव्यदक्षता आणि समाज सेवेची दखल घेऊन केंद्र सरकारच्या गृहविभागाने त्यांना या पदकाने गौरविले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

**पनवेल/ वृत्तसंस्था**

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट २०२६ रोजी खारघर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या खारघरमधील विविध शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांना या प्रसंगी 'स्मार्ट वॉच' आणि 'सन्मानपत्र' देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या पुढील वाटचालीस प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास भाजपचे युवा नेते प्रितम म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ ममता प्रितम म्हात्रे, तसेच स्थानिक नगरसेवक प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, समीर कदम, मधू पाटील, नगरसेविका अनिता पाटील, सोनल नवघरे, परेशा पटेल आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. सत्कारामुळे विद्यार्थ्यांच्या




चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांच्या चेहऱ्यावरील समाधानाचे भाव स्पष्ट दिसत होते. या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले. या सोहळ्याला भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गुणवंत विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गैरसोय दूर ; सुविधा परिपूर्ण : परळी वैजनाथ नगरपरिषद मुख्यालयात अत्याधुनिक नवी लिफ्ट कार्यान्वित!

## नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते श्रीफळ फोडून शुभारंभ





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगरपरिषद मुख्यालयाच्या इमारतीमध्ये अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी अत्याधुनिक लिफ्टची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. या नव्या लिफ्टमुळे मुख्यालयातील विविध मजल्यांवर ये-जा करणे अधिक सुलभ होणार असून, नागरिकांची होणारी गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे.

नगरपरिषद मुख्यालयात बसविण्यात आलेल्या नव्या अत्याधुनिक लिफ्टचा औपचारिक शुभारंभ नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.परळी नगरपरिषद मुख्यालयात विविध आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने लिफ्टची सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. लिफ्टमुळे वेळेची बचत होण्याबरोबरच मुख्यालयातील कार्यालयीन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना अधिक सुलभ व सोयीस्कर सुविधा मिळणार आहे.

■ २७२ किलो क्षमतेची लिफ्ट

ही लिफ्ट २७२ किलो वजन क्षमतेची आहे. एकावेळी चार ते सहा जणांना प्रवास करता येईल, अशा क्षमतेची आहे. जी+३ (ग्राउंड फ्लोअर प्लस तीन मजले) स्वरूपाची ही लिफ्ट असून, ती ग्राउंड फ्लोअरपासून चौथ्या मजल्यापर्यंत ये-जा करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक तसेच विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# "प्रपंच्यात  वय वाढले तर किंमत कमी होते, पण परमार्थात वय वाढले तर किंमत वाढते" - ह.भ.प. परस महाराज मुथा



**प्रतिनिधी | सोपान पगारे**

मौजे वाहिरा, माणिक गड ट्रस्ट येथे सुरू असलेल्या ४६ व्या अखंड हरिनाम सप्ताहातील पाचव्या दिवसाची कीर्तन सेवा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली.

पाचव्या दिवसाचे कीर्तनकार ह.भ.प. परस महाराज मुथा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनातून त्यांनी सांगितले की, "प्रपंचात वय वाढले तर किंमत कमी होते, पण परमार्थात वय वाढले तर किंमत वाढते."त्यांनी गायनातून व थोर महापुरुषांच्या विचारांवर प्रभावी निरूपण करत श्रोत्यांना परमार्थाची गोडी लावली. या दिवशीचे संतपूजन आटोळे ग्रुप यांच्यावतीने करण्यात आले. कीर्तन झाल्यानंतर स्वादिष्ट अशा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनासाठी वाहिरा व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोडखा येथील नामयज्ञ सोहळ्याची सांगता युवा कीर्तनकार माऊली महाराज पठाडे यांच्या कीर्तनाने; आरोग्य शिबिराने वाढवली शोभा



**प्रतिनिधी | सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील निमगाव बोडखा येथील अखंड हरिनाम सप्ताह व नामयज्ञ सोहळ्याची सांगता मोठ्या भक्तिमय वातावरणात युवा कीर्तनकार माऊली महाराज पठाडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

यावेळी परमार्थासोबतच आरोग्याची काळजी म्हणून *सरपंच ईश्वर मेटे यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. परमार्थिक सलोखा जपत सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

या सांगता सोहळ्यास युवा नेते सागर आप्पा धस* हे प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, "आपल्या समाजाचा एकोपा राहावा, परमार्थिक क्षेत्रात युवकांनी वेळ द्यावा, तर समाज चांगला झाल्याशिवाय राहणार नाही." त्यांनी ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या.

कीर्तनासाठी गायनाची साथ प्रवीण पाठारे,महाराष्ट्रातील पहिले तृतीयपंथी कीर्तन कर समाधान महाराज नाडकर, रेवनाथ मेटे, तुकाराम गगरडे यांनी केली, तर मृदंगाची साथ आकाश महाराज सायंबर यांनी पखवाज वादनातून केली.

तसेच सात दिवस व्यासपीठ संचालन ह.भ.प. सोमनाथ मेटे महाराज यांनी अतिशय सुंदर रित्या चालवले. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी शाळा वाचवा व केजी ते पीजी शिक्षण मोफत द्या आदि मागण्यांसाठी 1 सप्टेंबर रोजी रानबा गायकवाड यांचे उपोषण

## आमदार खासदार लोकप्रतिनिधीसह नोकरदारांची मुले मराठी शाळेतच घालण्याची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

मराठी शाळा वाचवा व के.जी. ते पीजी शिक्षण मोफत मिळावे यासह राज्यातील सर्व आमदार ,खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी व शासकीय,निमशासकीय नोकरदारांची मुले मराठी शाळेतच घालावीत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृतीत वाढ करावी आदी प्रमुख मागण्यासाठी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते रानबा गायकवाड हे येत्या 1 सप्टेंबर रोजी परळीत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसणार आहेत.

याबाबत रानबा गायकवाड यांनी नुकतेच उपविभागीय अधिकारी व परळीचे तहसिलदार यांना निवेदन दिले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की,फुले, शाहू ,आंबेडकरांच्या महाराष्ट्रात सर्वसामान्यांना मिळणारे शिक्षण दिवसेंदिवस महाग व दुरापास्त होत चालले आहे.राज्य सरकारने हजारो मराठी शाळा पटसंख्येच्या नावाखाली बंद केल्या आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण बंद पडले आहे.तसेच अनेक मराठी शाळांचे खाजगीकरण करून त्या उद्योगपतींना चालविण्यासाठी दिलेल्या आहेत. शिक्षणाचे सार्वत्रिककरणाकडून खाजगीकरणाकडे अशी सरकारने वाटचाल सुरू केली आहे ही संविधान विरोधी आहे.तसेच मोफत शिक्षण देण्याच्या सरकारच्या धोरणांच्या विरोधात आहे.

शिक्षण हे सर्वसामान्य, गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगार, उपेक्षित समाजासाठी , त्यांच्या प्रगतीसाठी आजही आवश्यक आहे. इंग्रजी शाळांचा सुळसुळाट आणि त्यांच्या लाखो रुपयांच्या फीसमुळे राज्यात शिक्षणाचा बाजार झाला आहे. बहुतेक शाळा या राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांच्या असल्याने जाणीवपूर्वक महानगर पालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका आदी सरकारी शाळा बंद पाडल्या जात आहेत.शिक्षकांना जाणीवपूर्वक इतर कामांत गुंतविले गेले आहे.नवीन शिक्षक भरती केली जात नाही.तसेच हजारो शाळांच्या इमारती पडक्या व धोकादायक अवस्थेत आहेत.

जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा नाहीत.चांगल्या शाळांच्या इमारती नाहीत यास सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार आहे.मराठी शाळा वाचविण्यासाठी तसेच सर्वसामान्य बहुजन समाजाला के.जी.ते पी.जी. शिक्षण मोफत मिळावे, राज्यात यापुढे नवीन इंग्रजी शाळांना परवानगी देऊ नये, मराठी शाळा वाचविण्यासाठी महाराष्ट्रातील आमदार ,खासदार , मंत्री मंडळातील सर्व मंत्र्यांचे मुले,नगरसेवक, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, राज्यातील शासकीय निमशासकीय कर्मचारी यांच्या मुलांना सरकारी मराठी शाळेतच शिक्षण घेण्याचा महाराष्ट्र सरकारने कायदा करावा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मध्ये वाढ करावी, सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शकपणे घ्याव्यात , राज्य सरकारने शिक्षणावरील खर्चात वाढ करावी आदी मागण्यांसाठी दिनांक 1 सप्टेंबर 2026 मंगळवार रोजी परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर रानबा गायकवाड उपोषणाला बसणार आहेत. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झिलमेवाड व पत्रकार विकास वाघमारे यावेळी उपस्थित होते.



# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश; सीना प्रकल्पातून आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना मिळणार दिलासा



**आष्टी :(प्रतिनिधी)**

सीना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढविण्याबाबत आ. सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सीना प्रकल्पात सध्या ३१० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून, यामुळे आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कुकडी प्रकल्पातून भोसे खिंडद्वारे सीना मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यात येते. मात्र सीना प्रकल्पातून यापूर्वी २०० क्युसेकपेक्षा कमी क्षमतेने पाणी सोडले जात असल्याने अपेक्षित प्रमाणात पाणी पुढे पोहोचत नव्हते. त्यामुळे आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

ही बाब लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी सीना कालव्याच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या. कालव्याच्या प्रवाहात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाण्याचा मार्ग बाधित होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सीना प्रकल्पातून अपेक्षित क्षमतेने पाणी पोहोचत नव्हते.

आ. धस यांच्या पाठपुराव्यानंतर संबंधित यंत्रणेने उपाययोजना सुरू केल्या असून, टँकरग्रस्त गावांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे. तसेच कालव्यातील अडथळे दूर करण्यासाठीही प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

- **मंगळावर पासून ४०० क्युसेक क्षमतेने पाणी सोडण्यात आले...**

दरम्यान, आजपासून कुकडी धरणातून सीना प्रकल्पाकडे ४०० क्युसेक क्षमतेने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. त्यानंतर सीना प्रकल्पातील पाणी तातडीने मेहकरी प्रकल्पाकडे सोडण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पालगतच्या गावांचा तसेच टँकरद्वारे सुरू असलेल्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे.

आष्टी तालुक्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आ. सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळणार असून, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महिला महाविद्यालयात आजीवन अध्ययन विस्तार केंद्र उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न



**परळी | वार्ताहर**

येथील कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयांत डॉ.बा. आ. म. विद्यापीठ प्रदत्त आजीवन अध्ययन - विस्तार केंद्र उद्घाटन सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष व उद्घाटक म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा संजयजी देशमुख लाभले. तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रा . नयनकुमार आचार्य यांची उपस्थिती होती .

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या सक्षम मार्गदर्शनात झालेल्या या उद्घाटन सोहळ्यात कार्यक्रमाचे

प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. आर.के.यल्लावाड यांनी आजीवन आनंदाने जगण्यासाठी आपल्या महाविद्यालयांतील हा आजीवन - अध्ययन व विस्तार विभाग कार्य करतो आहे . त्याने स्वावलंबन हा हेतू साध्य होतो , असे विचार मांडले व विद्यार्थिनीसाठी ड्रेस डिझाइनिंग ,बालवाडी , अंगणवाडी , सौंदर्य संवर्धन , बँकिंग , ग्रामीण पत्रकारिता कौशल्य - व्यक्तिमत्व विकास असे अनेक कोर्स असून याने आर्थिक स्थैर्य प्राप्त होते असे विचार मांडले . यानंतर प्रमुख वक्ते - प्रा नयनकुमार आचार्य . यांनी आपल्या वक्तव्यात माणूस बुद्धिमान आहे त्याची ती बुद्धि विपरीत चालली तर - माणसाचा राक्षस होतो व तीच बुद्धी सकारात्मक झाली तर नराचा नारायण होतो . असे विचार मांडले .

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ .विद्या देशपांडे यांनीही या विभागात महाविद्यालयाने आणलेल्या विविध सर्टिफिकेट कोर्सेसची विस्तृत माहिती दिली . या कोर्सेसला डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळते अशीही माहिती दिली. अध्यक्षीय समारोप करतांना मा संजयजी देशमुख यांनी स्व - विकासाचा मूलमंत्र म्हणजे हे आजीवन अध्ययन विस्तार विभाग असून यांत सहभागी होऊन स्वयंपूर्ण व्हा. असे विचार मांडले .

याप्रसंगी गतवर्षी या विभागात यश मिळविलेल्या विविध विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले याप्रसंगी या विभागाचे समन्वयक डॉ यल्लावाड व सह समन्वयक डॉ कल्याणकर यांच्यासह अनेक प्राध्यापकांची उपस्थिती होती या सोहळ्याचे सूत्रसंचालन कु संध्या सातपुते हिने केले तर डॉ. कल्याणकर यांनी आभार मानले .

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्वच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी समूह उपस्थित होता व विद्यार्थिनींचीही उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

# परळी वैजनाथ शहरातील जलकुंभांच्या दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरु

## नगराध्यक्षा, पाणीपुरवठा सभापती व मुख्याधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, यासाठी परळी नगरपरिषद मार्फत शहरातील जलकुंभांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. सुरू करण्यात आलेल्या या कामांची आज नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रविंद्र गित्ते, मुख्याधिकारी श्री. पी. एन. निगळ यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवण्याबरोबरच नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्याला नगरपरिषदेने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे जलकुंभांच्या दुरुस्ती व सुधारणेची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.जल कुंभांची परिपूर्ण दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत. यामध्ये जलकुंभामधील गाळ काढणे,आतून प्लास्टर, कलर ,नविन वॉल, फॅब्रिकेशनच्या शिडी भेगा भरणे व कॉंक्रीट दुरुस्ती,गंजलेले स्टील दुरुस्त करणे, छत/भिंतींचे मजबुतीकरण, जल कुंभार लिकेज थांबवण्यासाठी केमिकल कोटिंग,आतील बाजूस फूड-ग्रेड वॉटरप्रूफिंग, क्लोरीनेशन करून निर्जंतुकीकरण, इनलेट/आउटलेट पाइप तपासणी,व्हॉल्व्ह, फ्लोट व्हॉल्व्ह बदलणे,बाहेरील रंगकाम सुरक्षा रेलिंग, जिने दुरुस्ती तसेच आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या केला जाणार आहेत.

विविध जल कुंभांच्या दुरुस्त्यांच्या सुरू असलेल्या या कामांची नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रविंद्र गित्ते, मुख्याधिकारी श्री. पी. एन. निगळ तसेच नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आवश्यक त्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या.अनेक वर्षांनंतर जलकुंभांची ही देखभाल-दुरुस्ती होत असून, शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी नगर परिषद कटिबद्ध असल्याची ग्वाही सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)